प्रकरण 5 वे

## अरुण काळे यांच्या कवितेची अन्य वैशिष्टये

मागील तीन प्रकरणांतून अनुक्रमे अरुण काळे यांच्या कवितेतील आशयसूत्रे, आविष्कारतंत्रे अणि भाषाशैली यांचे विवेचन करुन अरुण काळे यांच्या कवितेचे रुप समजून घेतलेले आहे. ते विवेचन करत असताना अरुण काळे यांच्या कवितेतील वेगळेपण दर्शविण्यात आलेले आहे. 'रॉकगार्डन', 'सायरनचे शहर' आणि 'नंतर आलेले लोक' या कवितासंग्रहाच्या अनुषंगाने अरुण काळे यांच्या कवितेच्या अन्य वैशिष्ट्यांचा विचार करावयाचा आहे.

### 1) चळवळीतील कार्यकर्त्याचे आत्मचिंतन

अरुण काळे हे चळवळीतले कवी आहेत. ते लहानपणातच वेगवेगळ्या चळवळीशी जोडले गेले आहेत. ज्या नाशिकच्या शहरात काळें यांचा जन्म झाला त्या नाशिक शहरातच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहाचा लढा पेटला होता. काळे यांच्या नसानसांत क्रांतिकारी लढयाचं पाणी मुरलेले दिसून येते. कारण काळेचे कुटुंबही या चळवळीशी जोडले गेले होते . अरुण काळे यांच्या लहानपणात ज्वालाग्राही चळवळीत त्यांचे कुटूंब उध्दवस्त झाले. पॅंथरच्या चळवळीत त्यांचा लहान भाऊ क्रियाशील होता. अशावेळी अरुण काळे यांना चळवळीपासून दूर कसे राहता येईल ? ते या चळवळीत अधिकाधिक सक्रीय होत गेले.

अरुण काळे यांचा फुले-आंबेडकर विचारसरणीच्या चळवळीतून उदय झाला.महात्मा फुले यांनी गरीबांना शिक्षण दिले. देशात क्रांती आणली. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' असा संदेश दिला. समाज जागृती करणाऱ्या सर्वसामान्य माणसाला मानसन्मान मिळवून देण्यासाठी चळवळी केल्या. पण बाबासाहेबांना 'दैवत्व' बहाल करुन त्यांचे सर्वसामान्य माणसापासून फारकत करण्याचे डावपेच सुरु आहेत. हे सांगताना अरुण काळे यांनी म्हटलेले आहे.

*'बाबासाहेब तुम्हाला विभुती*
*बनवून मंदिर उभारण्याची*
*तयारी सुरु आहे.*
(विचारी माणूस/रॉकगार्डन -86 )

काळेंनी कवितेत कार्यकर्त्याचे कार्यकर्ता म्हणून असणारे रुपदर्शन आपल्यासमोर मांडलेले आहे. काळे म्हणतात वस्त्यांतून मिळणारी 'जयभीम' हा प्रतिसाद या कार्यकर्त्याची मिळकत असते. असे काळे मानतात.

*'दोस्ता, चिखल मातीत खेळताखेळता*
*आपण जयभीम चे नारे द्यायला शिकलो*
*प्रचंड धग घेऊनच आपण*
*रस्त्यावर आलो अनवाणी*
*आपले तळपाय झाले मोठे*
*तशाच टाचांच्या भेगा'*
( खंत/ रॉकगार्डन -35 )

अरुण काळे यांचे वडील आंबेडकरी चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्यांच्याविषयी आठवण नोंदविताना अरुण काळे एके ठिकाणी म्हणतात- " माझा बाप रुढ अर्थाने कुटुंबवत्सल, सालस, सरळमार्गी वगैरे नव्हताच. बऱ्याचदा आम्ही कितव्या इयत्तेत शिकतोय हे पण तो विसरुन जायचा. परंतु आंबेडकरी चळवळीतील तो निष्ठावंत व कार्यकर्ता होता आणि शेवटपर्यंत कार्यकर्ताच राहिला. 6 डिसेंबरला मुंबई व दसऱ्याला नागपूरला जाणे हे त्याचे नित्यक्रम. चळवळीतील कुठल्याही सभा, संमेलन, मोर्चात, शोभायात्रेत तो मोठ्या उत्साहाने सहभागी होत असे. बऱ्याचदा आम्ही भाऊ व बाप मोर्चात, शोभायात्रेत एकाचवेळी सामील झालेलो असायचो. मला बापाचा रागही येत असे. इतर कार्यकर्त्यांचे बाप कसे आपले वयोमानाप्रमाणे दुरुन गंमत पाहतात. ही गोष्ट मी बापाला बोलूनसुध्दा दाखवित असे परंतु त्याने ते कधी मनावर घेतले नाही. चळवळीतील कार्यकर्त्यांना खटल्यांमध्ये जामिन होणे व हरतऱ्हेची मदत करणे हा त्याचा छंद होता. तसा तो निधड्या छातीचा होता. 12 जून 83 च्या डॉ. आंबेडकर पुतळ्याच्या दंगलीत दीड-दोनशे लोकांचा लाठ्या, काठ्या, तलवारी, हॉकी,

चेन्स, चाकू वगैरेंनी युक्त असा जमाव नाशिक येथील आमच्या मोठा राजवाडा या वस्तीवर चालून आला तेव्हा बाप अतिशय बिनधास्तपणे स्टेजवर डॉ.आंबेकरांच्या पुतळ्याजवळ एकटा रिकाम्या हातांनी उभा राहिला. तो हिंस्त्र जमाव बापाचा जीवही घेऊ शकला असता, पण बापाने हिंमतीने व चातुर्याने तो सर्व जमाव परतवला व घडू शकणारा मोठा रक्तपात टाळला."[1]
अरुण काळे यांच्या कवितेत अशा या सच्च्या, बाणेदार आणि धैर्यवान कार्यकर्त्यांची रुपे वेगवेगळ्या पध्दतीने प्रकट झाली आहेत. पण कधीकधी अशा या कार्यकर्त्यांचा शेवट फारच मनाला चटका लावून जातो. अंगावर आलेल्या दंगलीत हकनाक त्याचा बळी जातो. तो दुर्लक्षित होतो. त्याचे अस्तित्व संपुष्टात येते.

*'मग तो टोपीच्याच आधारवर राहिला*
*छातीवर बिल्ला नसल्याने दुर्लक्षित राहिला*
*शेवटी चैत्यभूमीच्या रस्त्यावर*
*'निपचित पडला*
*रिकाम्या बाटलीसारखा'*
( रिकाम्या बाटलीसारखा / नंतर आलेले लोक -35 )

अरुण काळे यांची कविता चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वाचा सातत्याने वेध घेत राहते.

## 2) दलित कवितेला सामर्थ्य आणि वेगळेपण मिळवून देणारी कविता

अरुण काळे यांची कविता ही शोषितांचा पक्ष मांडणारी कविता आहे. शोषितांच्या जगण्यातील दु:ख, वंचना यांची मांडणी ते करतात. दलित या संकल्पनेची व्यापक स्तरावरील मांडणी या कवितेतून प्रकट होते. ही कविता समकालीन जीवनातील दलित मध्यमवर्गीय मानसिकतेचा शोध घेते. या कवितेत नव्या बदलाची मोहर उमटलेली दिसून येते. त्यामुळे दलित कवितेचे विकसीत रुप साकार होते. दलित कविता विविध जातीस्तरावर, समाजस्तरावर वास्तव जीवनाचा अविष्कार करते.

1980 नंतरच्या दलित कवितेत अनेक प्रकारचे बदल झालेले दिसून येतात. 1980 नंतर दहशतीचा मोठा ताण दलित कवितेवर पडलेला दिसून येतो. तसेच सांस्कृतिक वास्तवाचा

परिणामही दलित कवितेंवर झालेला दिसतो. दलित कविता ही जगाच्या वास्तवाचा शोध घेताना आत्मपरिक्षणाला सामोरे जाते. जगाच्या व्यवहारातील अंतर्विरोधाचे आकलन ती करते. समाजजीवनाच्या, सांस्कृतिक जगाच्या तसेच जगाचे अस्तित्व केवढे आणि किती याचा ती शोध घेते. जातीमातीचे अनेक स्तर व प्रदेश, प्रदेशातील होणारे शोषण, शोषणाच्या तऱ्हा या दलित कवितेने प्रकट केलेल्या दिसतात. या कवितेने देशी वास्तवाचे रुप प्रकट केल्याचे दिसून येते. विविध स्तर आणि प्रदेशांच्या पार्श्वभूमीवर दलित कविता ही समृध्द झालेली आहे. कारण गौतमबुध्द,महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर या मानवमुक्तीच्या आदोलकांनी या दलित कवितेची मुळं रुजवलेली आहेत. दलित, पिडीत, बहुजनांच्या शोषणमुक्तीच्या विचारातून दलित कवितेतील देशीयता सार्थ ठरते. आशय आणि विचार प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न दलित कवितेने केला आहे. परंपरेची उलटी मांडणी दलित कवितेत झाल्याचे दिसून येते. तसेच संस्कृती, संघर्षाची चित्रे दलित कवितेत साकार झाली आहेत. दलित कवितेत निसर्ग, प्रतिमा, माणसाला माणसांरखे जगण्यास आवश्यक असणाऱ्या विचारांशी जोडूनच येतात. दलित कवितेतील विचार, जीवनपध्दती,भाषा, निसर्ग, प्रतिमा आणि प्रतीके ही सर्व बहुजन आहेत. पूर्वसुरींच्या दलित कवितेत विद्रोह आणि आक्रमकपणा वाढलेला दिसून येतो. 1980 नंतरच्या दलित कवितेने जाणीवपूर्वक नव्या वाटांची दिशा जोपासल्याची दिसून येते. नव्या वाटेवरील दिशांचा प्रवास या दलित कवितेत जबाबदारीने आणि काळजीपूर्वक झालेला दिसून येतो. दलित कवितेत भाषेच्या विविध छटा दिसतात.

नव्या शब्दांचे विश्व या दलित कवितेने उभे केल्याचे दिसून येते. चिंतन गर्भता,व्यामिश्रता,प्रतिमा,प्रतिमांची मोडतोड या अनेक गुणवैशिष्ट्यांनी दलित कविता साकार झाल्याचे दिसून येते. दलित कवितेच्या जोमदार सुरुवातीनंतर दलित कवितेत एककसुरीपणा,साचेबंदपणा येवु लागला. त्यामुळे दलित कवितेत थांबलेपणा ,साचलेपणा असे आरोप टीकाकारांनी केले होते .दलित कवितेतून जागतिकीकरण,खाजगीकरण,या अर्थिक व्यवस्थांचा विचार आलेला दिसून येतो. जगात सत्ता ही सर्वश्रेष्ठ मानली जाते. त्यामुळे

धर्माच्या नावावर रकत सांडलेले दिसून येते . देशात असलेल्या लोकशाहीची हुकूमत ही धर्मापुढे कुचकामी ठरते. त्यामुळे लोकशाही हुकूमत ही धर्मापुढे कुचकामी ठरते. त्यामुळे लोकशाही नष्ट झाल्याचे दिसते. तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या विकासामुळे जगाची प्रगती होवु लागली. तशी युध्दजन्य परिस्थिती वाढल्याचे दिसते. जग जवळ आले तशी माणसे एकमेकांपासून तुटत गेली धर्माच्या वाद-विवादातून शहराचे संतुलन बिघडले जाते आणि धर्माचा माणसाचा शोषणासाठी साधन म्हणून वापर होवु लागला.

शास्त्र आणि आधुनिक शस्त्रे यांमुळे माणसाचे मरण अधिक सोपे झाल्याचे दिसून येते. जगाच्या इतिहासात परिणामातून ,घामातून, सौंदर्यशिल्पे ,वास्तु ,लेण्या निर्माण झाले त्या माणसांचे उल्लेख इतिहासाच्या पानात आढळत नाहीत. जगाच्या कल्याणासाठी शांततेचा संदेश देणारे विचार-आचार माणसाने पुसून टाकलेली आहेत. शांततेच्या नावाखाली अशांतता पसरत चालली आहे. जगाच्या इतिहासात अनेक थोर युग पुरुष होवुन गेलीत. दलित कवितेून अशा जागतिकीकरण,सामाजिकरण,खाजगीकरण इत्यादी गोष्टींचा उल्लेख उत्तमरित्या केल्याचे दिसून येते. म्हणून दलित कवितेतून अनेक सामाजिक ,घडामोडी, लोकशाही,हूकूमशाही, परंपरा,आहिंसा,हिंसा इत्यादी अनेक गोष्टी दलित कवितेतून आढळून येतात.जगाच्या इतिहासात विज्ञानाचा शोध लागला विज्ञानातून माणसांचा विकास झाला. तंत्रज्ञानामुळे मानवांमध्ये प्रगती होवू लागली. लोकजीवनाला वेगळे वळण मिळाले. देशात तंत्रविकासित झाले. त्यामुळे माणसांची काम करण्याची क्षमता वाढू लागली त्यामुळे मानवाचा विकास होवू लागला. अशा अनेक घटकांचा उल्लेख दलित कवितेतून आल्याचे दिसते.

1980 नंतरच्या दलित कवितेत भुजंग मेश्राम, लोकनाथ यशवंत, लहू कानडे,प्रज्ञा लोखंडे, महेंद्र भवरे इत्यादी कवीनी महत्त्वपूर्ण काव्यलेखन केलेले आहे. अरुण काळे हेही 1980 नंतरच्या कालखंडात पुढे आलेले कवी आहेत. काळ्यांची कविता ही वैशिष्ट्यपूर्णतेने भरलेली आहे. त्यामुळे त्यांची या सर्व कवींमध्ये कविता उठून दिसणारी आहे. दलित कवितेत अरुण काळे यांचा मोलाचा वाटा असल्याचे दिसून येते. काळे यांच्या कविता या 1980

नंतरच्या दलित कवितेत नवे प्रवाह निर्माण करुन कवितेला वळण देणाऱ्या कवीमध्ये काळ्यांची कामगिरी खूप महत्वाची आहे. त्यांच्या या कवितेमुळे दलित कवितेला नवी दिशा मिळाली आहे असे वाटते.

आंबेडकरांच्या लढाऊ वृत्तीमुळे काळ्यांच्या कवितेच्या जीवनाची बाजू भक्कम झालेली दिसते. बंडखोरीची प्रेरणा कवितेसारख्या वाङमय प्रकारात अधिक तीव्रपणे प्रकट होते. याविषयी रा.ग.जाधव म्हणतात.''तीव्र भावना ,उत्कट जाणीवा या नेहमीच काव्यभाषेतून प्रथम व्यक्त होतात. आणि स्वातंत्र्याच्या जाणीवेइतकी तीव्रोत्कट जाणीव दुसरी कोणती असू शकेल ? दलितांना ज्यावेळी पुरातन काळापासून प्रखर पारतंत्रतेची तीव्र कल्पना आली नि त्या पारतंत्रतेचा नि:पात करण्याची अनावर पण न्याय आकांक्षा स्फुरली, त्यावेळी पहिला उद्गगार काव्यभाषेतून उमटला. काव्य हे भाषेच्या विमुक्त अवस्थेचे आद्य नि अखेरचे रुप आहे. स्वातंत्र्याची बिनशर्त सनद भाषा ही काव्याच्या द्वाराच देत असते. म्हणून स्वतंत्रतेचा अनावर प्रत्यय,आनाव ओढ ही भाषेच्या काव्य रुपातून स्वाभाविकपणे अभिव्यक्त होते. दलित साहित्याचा विकास विस्तार गद्याच्या नाना, अंगानी,नानाप्रकारे होत राहिला तरी,त्यांचा आत्मा काव्यातच आढळेल. कारण दलित साहित्याचा जन्म स्वातंत्र्याच्या कुशीत झालेला आहे. आणि काव्य व स्वातंत्र्य यांचा मेळ निसर्गानेच सांस्कृतिक घडणीत घालून दिलेला आहे.''[2]

### 3. महानगरीय जीवनाचा आलेख

अरुण काळे यांच्या कवितेत महानगरीय कवितेची एक वेगळी दिशा मांडलेली आहे. काळयांनी नवनव्या जाणिवा कवितेत आणल्या. काळे यांनी महानगरीय वास्तवाची बदलत्या स्वरुपाची बदलती कविता आपल्या कवितेतून प्रकट केली त्यांनी आपल्या कवितेत महानगरीय माणसाच्या असुरक्षितता जीवनाचे चित्रण आपल्या कवितेतून केले. चहुबाजूंनी वाढलेल्या आणि वेढलेल्या महानगराच्या सामान्य माणसाच्या जीवनाची होत गेलेली दुर्दशा या महानगरीय कवितेत मांडलेली दिसून येते. काळेंची कविता मांडणीच्या स्वरुपात वेगळी ठरते. महानगरीय जीवन हे गर्दीचा महापूर आणि गुंतागुंतीने भरलेली दिसून येते. ती या वास्तवाचे

दर्शन घडविण्याचा ही कविता प्रयत्न करते. महानगरात दंगल, भीती, मारामारी, जाळपोळ या गोष्टी सतत होत असतात. त्यामुळे महानगरीय जीवन हे चिंताग्रस्त आणि भयकारी असलेले दिसते. सातत्याने लागू होणारा कर्फ्यु महानगरीय माणसाच्या सवयीचा होऊन बसला आहे. म्हणून अरुण काळे म्हणतात.

*' दंगलतज्ञांचा समूह कामाला लागला*

*कर्फ्युच्या शांततेपूर्वीचा भडका उडाला '*

(सायनरचे शहर/ सायनरचे शहर - 10)

महानगरीय जीवन हे सामान्य माणसाच्या हिताला जोपासणारे नाही. महानगरीय जीवनात अनेक विध्वंसक आणि विनाशकारी कृत्ये घडतात.

अरुण काळयांनी महानगरीय जीवनाची अनेक वैशिष्ट्ये महानगरी कवितेत मांडलेली आहे. तसेच काळे यांनी महानगरीय कवितेत स्त्रीविषयक व्यथा मांडलेली आहे हे या कवितेचे एक वैशिष्टय ठरावे. महानगरात माणसाला एकटेपणा जाणवतो. अरुण काळे यांच्या कवितेतील महानगर हे एक नरक आहे. या महानगरात प्रत्येकाला जगणे अशक्य वाटते आहे. जगण्याच्या वाटेवर पावला-पावलावर मरण आलेले आहे. असे दिसते की हे आयुष्य भरवशाचे नाही. इथे माणसाला जगण्याची खात्री देता येत नाही. या शहरात माणूस एक निर्जीव घटक बनलेला दिसून येतो. त्यामुळे या शहरात माणूस हा आपली सहनशीलता गमावून बसलेला दिसतो.

*'वाद शिल्लक नसले म्हणजे*

*सुरु होते आपले*

*हा मुंबईवाला, तो नागपूरवाला*

*अन् हसते आपल्याकडे बघून*

*दुरुन हे शहर '*

(हे शहर तसे आपले नाहीच/ सायरनचे शहर -11 )

अशा या भयकारी महानगरीय जीवनाबद्दल महेंद्र भवरे म्हणतात- "सायरनचे शहर सर्वसामान्यांच्या जगाला हसणारे आणि नकाराधिकार वापरणारे आहे. मुक्या मारातून शिणका उठाव्यात तसे या शहरात सायरन वाजतात. या शहरावर गिधाडांनी साम्राज्य प्रस्थापित केले आहे.या शहराचा तोल केव्हाही ढळतो. झोपेची गोळी घेऊनही अस्वस्थ अंधार जागवणारे हे शहर तसे बेटांचे आहे. जाती,धर्म,पंथाच्या बेटांनी वाढलेले आणि वेढलेले आहे. दोन नंबरी नगरपाल या शहराचे पालक आहेत. या शहरातील रस्ते अशक्त नसनाडयासारखे असून या रस्त्यावरच माणसांची जिंदगी लुटली जाते, हे शहर रस्तोरस्ती शरीराची मागणी करते. संवेदनांना गाडत जाणाऱ्या या शहरात माणसे लोकल्सच्या पारंब्यांना लोंबकळत सुरपारंब्या खेळतात. आणि लोकल्सच्या मुडदाही पाडतात, शेअर्ससारखी वधारतात आणि कोसळतात. इथे मासागणिक संदर्भ बदलतात. 'ही नगरी बडी बांका ,जिवावर रोज प्रसंग बांका' इथे पोटासाठी पुढे पुढे धावणाऱ्यांच्या मागे मरण लागले म्हणून प्रत्येकाच्या डोक्यावर सरण बांधलेले दिसते. हे शहर धर्मांध असून माणसाच्या सुरक्षिततेची कोणतीच हमी या शहरात नाही. रक्ताचा रंग सर्वत्र सारखाच असतो त्या प्रमाणे जातधर्म टिकवणाऱ्या सर्वांच्या जळण्याचा एकच वास आसमंतात पसरला आहे. "[3]

महानगरीय माणसाला संरक्षण मिळत नाही.त्यामुळे त्यांना अनेक घटनांना सामोरे जावे लागते. त्यातून मार्ग काढावा लागतो. अशा घबरलेल्या माणसाची विविध रुपे स्पष्ट झालेली दिसून येतात. त्यामुळे माणूस वर्तनात परिवर्तन करु लागला. हे महानगर असुरक्षित असे आहे. महानगरात सामान्य माणूस हा अनेक वेगळया वृत्तीच्या गोष्टीना शरण गेलेला दिसून येतो अनेक अतंरावरती धोका दिसून येतो . त्या धोक्याचा आवाज सांगणारी सायरनची घंटा वाजते आहे. आणि शहरातील वातावरण हे बिघडलेले दिसते या शहरात काय घडणार आहे. या भीतीने सामान्य माणूस त्रासला आहे. सामान्य माणूस हा आपल्या कुटूंबाला सांभाळण्यासाठी धडपडत असतो.कुटूंबाचे स्वास्थ धोक्यात आलेले बघून सामान्य माणूस अस्वस्थ झाला आहे. महानगरात सामान्य माणसाला स्वत:ची सुटका करुन घेणे अवघड झालेले आहे.

महानगरात ढोंगी,फसवे अशा अनेक प्रकारचे लोक राहतात. या जगात जगण्याची शाश्वती देता येत नाही. त्यामुळे सामान्य माणसाची या शहरात पिळवणुक होत आहे. या महानगरीय वास्तवाचे भान काळे यांनी महानगरीय कवितेतून मांडलेले आहे. महानगरीय कवितेत वेगळया संस्कृतीचा काळेंनी विचार केलेला दिसतो. अरुण काळे यांच्या कवितेत महानगरीय जीवन हे बेकारी ,असूरक्षितता, अस्वच्छ वस्त्या, अत्याचार ,धावपळ गुंडगिरी, अमानवीकरण अशा गोष्टींनी भरलेले असून,त्यामुळे सामान्य माणसाचा जीव गुदमरुन चालला आहे.

*' चिलखती विभागात राहतात.तात्विक अधिष्ठान*
*देणारे कुणीही काढतं कशाचीही*
*खुन्नस बुडबुडयांच्या वस्त्यात '*

(संदर्भासहिंत स्पष्टीकरण /सायरनचे शहर, - 34 )

**4. कोणत्याही विशिष्ट साचेबंद कप्प्यात बंदिस्त करता न येणारी कविता**

काळे यांची कविता ही कोणत्याही विशिष्ट प्रवाहात बसविता येत नाही. कारण काळे यांच्या कवितेतून दलित सामान्य वर्गाची जाणीव करुन दिलेली आहे. त्यामुळे काळे यांची कविता ही माणसाची कविता असलेली जाणवते. कारण काळे यांना माणुसकीबद्दल आदर, जाणीव आहे. काळेंनी कवितेतून वेगवेगळी जाणीव समोर ठेवून कविता केलेल्या दिसतात. अरुण काळे यांची कविता ही वेगळ्या दृष्टिकोनातून निर्माण झालेली कविता आहे.

काळे यांची कविता ही आंबेडकरी विचारांची कविता आहे. काळेंच्या कवितेचे वैशिष्ट्य हे की काळयांची कविता ही माणसांविषयी असणारी त्यात रमून जाणारी त्या गोष्टीविषयी विचार करणारी अशी आहे. त्यामुळे काळे यांच्या कविता अनेक अनुभवांना स्पर्श करते.

काळे यांना रॉकगार्डन या कवितासंग्रहात रक्तात रुजलेल्या या बोरीबाभळी या कवितेत एका रक्तात रुतलेल्या काटेरी विश्वाचे अनुभव कवितेत मांडले आहेत.

*'रक्तात रुजलेल्या या बोरी बाभळी*
*आणि करवंदीच्या जाळी*
*घायकुतीला आलेली ही बेटं घायपाताची*
*ही पिरगळलेली वेदना साबरांची*
*चिल्लारींची, निवडुंग व शेरांची*
*दुधारी पावसाचे हे हकनाक बळी '*

( रक्तात रुजलेल्या बोरी बाभळी/ रॉकगार्डन, 33 )

फुलं स्वप्नात कधी येत नाहीत आणि गुलमोहर ध्यानात कधी येत नाहीत. असे या गाठलेल्या आणि खुरवटलेल्या जगाचं दु:ख पाहून काळे आपल्या कवितेत म्हणतात. ती सामाजिक, क्रांतीशी आणि पर्यायाने आंबेडकरांच्या क्रांतीशी प्रसिध्द करणारी कविता आहे. काळ्यांनी कवितेत निसर्गाचे नाते हे समाजाशी जोडले गेले आहेत. काळेंची कविता ही सामाजिक, सांस्कृतिक जडण-घडणीतून निर्माण झालेली दिसून येते. काळे यांच्या कवितेत वेगळेपण दिसून येते. त्यामुळे काळे यांच्या कविता या अनेक वैशिष्ट्यपूर्णतेने भरलेल्या दिसून येतात. काळे यांच्या कवितेतून वेगळी जाणीव निर्माण होते. त्यामुळे काळे यांची कविता ही कोणत्याही विशिष्ट प्रवाहात बसविता येत नाही. गणेश विसपुते म्हणतात त्याप्रमाणे, " विशिष्ट नैतिक मूल्यांवरची श्रध्दा,नितळ दृष्टी आणि यातून साधलेला वेगळा कोन यामूळे अरूणच्या कविता भाषा,इतिहास,वर्तमानचं खोल भान,समज या सगळया पातळयांवर वैशिष्टयपूर्ण ठरतात. कारण पुरुष असो की स्त्री- त्यांना अरूणच्या कविता माणूस म्हणून पुनर्स्थापना करण्याचा अतिशय प्रामाणिक प्रयत्न करतात."[4]

## 5. उत्कट आणि भावदर्शी व्यक्तिचित्रणे

अरुण काळे यांनी अनेक व्यक्तिचित्रणात्मक कविता लिहील्या आहेत. यात भुजंग मेश्राम, बाबुराव बागुल, दादासाहेब गायकवाड, बाबासाहेब आंबेडकर, नेल्सन मंडेला अशी अनेक व्यक्तिचित्रण येतात. माणसांवरचे प्रेम अरुण काळे यांच्या कवितेतून वाहते. अशा

प्रकारच्या व्यक्तिचित्रणातून सर्वसमान्य माणसाची एक अप्रतिम कविता काळे यांना इथे सापडते. अरुण काळे यांच्या कवितेतून सामान्य माणसे गर्दी करीत असतात. ज्यांच्या आयुष्यात काहीच उरले नाही. वास्तवशील व्यक्तीवरचे लेखन त्याच्या कवितेत आढळते. अरुण काळे यांची कविता माणसांचा समुहाचा, वृत्तीप्रवृत्तीचा शोध घेते. काळे यांची कविता मानवी समाजाच्या माणसांच्या व्याप्तीचा शोध घेते. सर्वसामान्य माणसाच्या जगण्याला काळेंनी प्रथम स्थान दिलेले आहे. काळे यांचे माणूसकी बद्दलचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. अरुण काळे म्हणतात, " 'लहानीबाय : लार्जेन दॅन लाईफ' ही नंतर आलेली लोक मधील अत्यंत महत्वाची व्यक्तिचित्रणात्मक कविता. 'लहानीबाय लार्जर दॅन लाईफ' ही या संग्रहातील अत्यंत महत्वाची स्त्री चित्रणात्मक कविता. लहानीबाय ही स्वतंत्र विचारांची आणि अत्यंत नैसर्गिक अशी स्त्री. सामन्य वर्गाची प्रतिनिधी. ती चतुर्थश्रेणी वर्गातील कर्मचारी आहे. मात्र ती संस्कारांच्या आणि परंपरांच्या ओझ्यांपासून पूर्णत: मुक्त असल्याने तिच्या स्वत:च्या जीवनशैलीला तिचे म्हणून एक वेगळे परिणाम लाभलेले आहे. चारचौघीसारखेच लहानीबाईचे योग्यवेळी लग्न झाले . पण सहा महिन्यातच तिला वैधव्याच्या फेऱ्याला तोंड द्यावे लागले.पण अशा स्थितीतही लहानीबाईने कुणाच्या आधाराची अपेक्षा केली नाही.तिने कंबर कसली आणि पुरुषांच्या बरोबरीने नव्हे तर त्यांच्यापेक्षा तसूभर जास्तच काम करुन ती नेटाने उभी राहिली .पुढे तिला चार मुले झालीत. दोन वारली,दोन जगली, पण या मुलांपुढे तिने वारलेल्या नवऱ्याचेच नाव लागले.लहानीबाईच्या दृष्टीने पारंपारिक,नैतिक-अनैतिक या संकल्पनाचे अर्थ वेगळे आहेत.तिची स्वत:ची म्हणून एक जीवनदृष्टी आहे. म्हणून जेव्हा तिच्या मुलांच्या जन्माविषयी कुणी टोमणा मारला तर ती पिसाळते आणि रोखठोक भाषेत असे काही ठणकावते की समोरचा भिडू सर्दच झाला पाहिजे.लहानीबाईची खूप मोठी जरब आहे कुण्या गरिबावर अन्याय होत असला तर लहानीबाई त्याच्या बाजूला उभी राहते.वाडीतल्या अनेक सार्वजनिक अडीअडचणीबद्दल संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरते.अलिकडे तिच्या अशा गुणांचा फायदा अनेक राजकीय पक्ष घेऊ लागले आहेत.राजकीय पुढाऱ्यांना तिची मनधरणी करावी

लागते.मतदानाच्या दिवशी 'लेडीजचं मतदान' करुन घेण्याची जबाबदारी तिच्याकडे असते. रॅली, मोर्चे, उपोषणे, शिष्टमंडळ, हुंडा-मोर्चे अशा सर्व गोष्टीत ती सर्वांत पुढे असते, म्हणूनच नजीकच्या काळात राजकीय व्यक्तिमत्व म्हणून लहानीबाय पुढे अशा सर्व गोष्टीत ती सर्वात पुढे असते,म्हणूनच नजीकच्या काळात राजकीय व्यक्तिमत्व म्हणून लहानीबाय पुढे येण्याची शक्यता आहे. आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत ही जाणीव कदाचित लहानीबायला नसेलही आपल्या जगण्याशी प्रामाणिक राहणे ही गोष्टच तिला अधिक महत्वाची वाटते.

अशी ही लहानीबाई जगण्याला मोकळेपणाने सामोरी गेली.जगता जगता वाढत गेली आंणि वाढता वाढता 'लार्जन दॅन लाईफ' झाली."[5]

गणेश विसपुते अरुण काळे यांच्या कवितेत प्रकट झालेल्या स्त्री व्यक्तिचित्रणाबद्दल म्हणतात "अरुणच्या कवितेतल्या स्त्रिया कोण आहेत ? त्याच्या कवितेत आई येते. रमाई येते,सावित्री जेनी,विनी येतात. बार-बाला येतात. चळवळीत साथ करणारी सहचारिणी येते लढाऊ लहानीबायही येते. रमाई, सावित्री, जेनी या वंदनीयच स्त्रिया आहेत. पण सर्वसामान्य बारबाला,लहानीबाय या स्त्रियांवर अरुणने विशिष्ट कोनातून टाकलेल्या झोतामुळे आपल्याला त्याही जगण्याचा संघर्ष करणाऱ्या आणि आदरणीयच वाटतात.महात्मा फुलेंनी स्त्री पुरुषात श्रेष्ठ अशी मानवी म्हणजे सत्स्त्री मानले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणातून अर्थार्जन,शिक्षणातून उन्नती असा मंत्र दिला.सवर्ण स्त्रिया शिकू लागल्या त्याच काळात दलित स्त्रीही शिकू लागली होती संविधानात दलितांना माणूसपणाचा हक्क बाबासाहेबांनी मिळवून दिला .ही वर्षांच्या इतिहासातली मोठी घटना होती. त्यांनी जन्मावरुन ठरलेला वर्ग, वंश, जात, लिंग या आधारावर ठरलेल्या शुचिता,योनिशुचितेच्या संकल्पनेला विरोध केला होता.आंबेडकरी चळवळीत वाढलेल्या अरुणनं त्या परंपरेची मूल्यंही डोळसपणे स्वीकारली होती. त्याचमुळे त्यांच्या कवितेतली स्त्री भोग्य वस्तू म्हणून येत नाही,तर स्वतंत्र लढाऊ अशी व्यक्ती म्हणून येते.निव्वळ तटस्थतेनं त्याच्या कवितेतल्या स्त्रिया भोग वस्तू म्हणून येत नाही, तर स्वतंत्र लढाऊ अशी व्यक्ती म्हणून येते. निव्वळ तटस्थतेनं त्याच्या कवितेतल्या स्त्रिया

रेखाटलेल्या काही ठिकाणी दिसतातही, पण करुण आणि समतेचा सहानुभाव आपल्याला जाणवत राहतोच."[6]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे काळेंच्या कवितेतील मुख्य प्रेरणास्थान, बाबासाहेबांनी दलितांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. त्यांनी जगण्याचे भान दिले. त्यांच्याविषयी कृतज्ञता अरुण काळे तू 'मदरबोर्ड माझ्या संगणकाचा 'या अप्रतिम कवितेत प्रकट करतात.

*आत या आयटीच्या युगात*
*दलित डि-लिट करण्यासाठी*
*नवनवीन सॉफ्टवेअर येताहेत*
*आणि प्रोग्रॅम खराब करण्यासाठी*
*सोडले जाताहेत विषाणू*
*तरीही तुझी ॲन्टी व्हायरस खबरदरी*
*पुन्हा पुन्हा करतेय त्यांना पराभूत*

( तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा/ नंतर आलेले लोक -37)

त्याबरोबरच कवी बाबासाहेंबाबरोबरच मातोत्री रमाबाईनाही विसरलेला नाही.

गुलामगिरीविरुध्द आयुष्यभर लढा देणाऱ्या नेल्सन मंडेला यांनाही कवी विसरलेला नाही.

*मालकांना गुलाम, दलित, पिडित*
*निराश्रीत आदिवासी बनवणे*
*जितके जुने तितकेच जुने त्यांना*
*चोर घरभेदे ठरवुन*
*आजन्मपेठीत ढकलणे*

( नेल्सन मंडेला /रॉकगार्डन- 56)

तसेच मंडेलाच्या कार्यासाठी त्यांना प्रेरणा ठरणाऱ्या सावित्रीबाई,रमाबाई,कार्ल मार्क्सची पत्नी, जेनी स्वत: मंडेलाची पत्नी विनी यांना ही मानवंदना करतो.

अशा पध्दतीने अरुण काळे यांनी आपल्या कवितेतून समाजाची समाजातील माणसाची निसर्गाशी मानवी जीवनाशी नाते जोडणाऱ्या माणुसकीची महानगरीय जीवनात घडून येणाऱ्या सामान्य माणसांची, दलित वर्गाची, स्त्री जीवनासंबंधीची आंबेडकरांच्या विचारांच्या प्रेरणेशी वर्तमानाचा शोध घेतलेला दिसून येतो. अशा पध्दतीने अरुण काळे यांच्या कवितेत इतिहासाच्या परिप्रेक्ष्यात वर्तमानाचा शोध घेत राहते.

अरुण काळे यांच्या कविता या जीवनाच्या काळातील वर्तमानाबद्दल आहेत. अरुण काळे यांची कविता ही प्रकाश देणारी आहे. अरुण काळे यांची कविता भारतीय निसर्गाच्या बोर्डावर सांस्कृतिक वातावरणात काळ आणि आकाशाचा माणूस आणि माणुसकी शोधते. काळेंची कविता तत्वप्रणालीशी जोडली गेलेली आहे. काळे यांनी वर्तमान काळाच्या भाषेतून राजकीय हास्याचे भेदक आणि स्पष्ट चित्र त्यांच्या कवितेने व्यक्त केले आहे. वर्तमानाचा हा बोर्ड कायम जागृत ठेवण्याचं कार्य अरुणच्या कवितेने केले आहे. वर्तमानाचा दाखला देत त्यांची कविता तत्वज्ञानाने निर्माण झालेली दिसते. तसेच सामाजिक, राजकीय विचारांची मांडणी त्यांची कविता करते. समाजाचे वास्तव, समाजाचे भान राखताना त्यांची कविता वर्तमानाचा शोध घेते.

## 6. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत माणसाची बाजू घेणारी कविता

जागतिकीकरणाच्या या काळात जग हे आता मुक्त बाजारपेठ बनले असून माणूस हा या जगातील नागरिक न राहता या बाजारपेठेतील ग्राहक बनला आहे. जागतिकरणाच्या प्रक्रियेविषयी अविनाश सप्रे म्हणतात, " व्यक्तीची ओळख निव्वळ ग्राहक म्हणून राहिली तरी सारेच ग्राहक झाल्यामुळे या ओळखीला फारसा अर्थ नसतो. थोडक्यात जागतिकीकरणात माणसाच्या अमानुषीकरणाच्या अभद्र प्रक्रियेला सुरुवात होते. माध्यमांचे वर्चस्व ,माहितीचा

प्रचंड स्फोट आणि तंत्रज्ञानाचा अभूतपूर्व विकास ही या नव्या काळाची खास वैशिष्टये आहेत. एका बाजूला जागतिकीकरणाच्या म्हणजेच मुक्त अर्थव्यवस्थेत उत्तर-आधुनिक कालखंडात शहरी मध्यमवर्गाचे दैनंदिन जीवन कमालीचे बदलून गेलेय. मार्केट इकॉनॉमीच्या प्रलोभनांचा प्रचंड ताण या शहरी मध्यमवर्गावर पडतोय.तर दुसऱ्या बाजूला भूक, दारिद्रय, विषमता,अज्ञान ,निरक्षरता इत्यादी.गोष्टीमुळे अजूनही खूप मोठा समूह या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेशी अजिबात संबंध नसल्यासारखा कोसो मैल दूर आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया अटळ आहे आणि त्यापासून अलिप्त राहणे शक्य नाही. या सर्व परिस्थितीला कसे सामोरे जायचे हा आजच्या पिढीसमोरील महत्वाचा प्रश्न आहे.

जागतिकीकरणातून निर्माण होत असलेल्या संस्कृतीचे फलस्वरुप म्हणून गेल्या काही वर्षात जीवनशैली मध्येही झपाट्याने बदल होत आहे.हा बद्दल महानगरामधून प्रामुख्याने होत असला तरी अन्य शहरांतून तो हळू हळू पसरु लागला आहे. आणि तो निर्माण करणारे घटक आणि साधने वाढू लागली आहेत. उत्पादनापेक्षाही (production) उपभोग (consumption) वाढावा अशी प्रक्रिया होत आहे.'you are what you buy' हे या जीवनशैलीचे घोषवाक्य आहे. 'I think,therefore,Iam' हे एकेकाळी माणसाचं वैशिष्टये मानलं गेलं आता अशी भूमिका होऊ लागली आहे. खरेदीचं माहात्म्य एवढं वाढलं आहे. आवश्यकता असो व नसो, खरेदी करणे आणि उपभोग घेणे ही वृत्ती वाढत आहे. शॉपिग मॉल्स ,हेल्थ क्लब्स,रेस्तरांज,मल्टिप्लेक्स थिएटर्स,प्रसाधनांची दुकाने,मोबाईल्स इत्यादींची संख्या वाढत आहे. 'we have become tourists in our own cultures'आता परंपरेने येणाऱ्या व्यवसायाभिमुख संस्कृती ऐवजी एका सर्वसमावेश जीवनशैलाचा प्रभाव निर्माण झाला आहे. जीवनशैली ही संकल्पना नवी नाही, पण तिला जाहिरातीच्या माध्यमातून आणि माऱ्यांतून व्यक्तिमत्व आणि आत्म - आविष्कारदर्शक नवे संदर्भ देण्यात आले आहेत. तुमच्याकडे उपभोग वस्तू ( consumr goods )किती आहेत यावर तुमची प्रतिष्ठा अवलंबून आहे, असे वातावरण निर्माण करण्यात

येत आहे. शॉपिंग मॉल्समध्ये तुम्ही खरेदी करा वा ना करा,वीक -एंड चा सर्वांसह भेट देण्याचा तो एक कार्यक्रम बनत आहे. देखण्या पुरुषी शरीराची प्रतिमा जाहिरातीतून आणि माध्यामांतून संरचित (construct) केली जात आहे. शरीरसंपदा चांगली असावी आणि त्यासाठी सर्व तऱ्हेने व्यायाम करावेत ही बाब नवी नाही,पण आता हे शरीर हव्या त्या पध्दतीनं आकर्षक आणि देखणं करता येईल,हवा असल्यास नाकाचा आकार बदलता येईल, सुरकुत्या काढता येईल,छातीवरचे केस घालवता येतील;शरीर तरुण दिसावं असं सारं करता येईल.त्यासाठी आता कॉस्मेटिक्स सर्जरीची सोय आहे, आणि सर्व तऱ्हांची कॉस्मेटिक्स तर हवी तेवढी उपलब्ध आहेत,हेल्थ प्रमोशनचे प्रोग्रॅम्स आहेत, डायट्ससंबंधी सल्ले देणाऱ्या संस्था आहेत; आणि काय खावे,प्यावे म्हणजे शरीरस्वास्थ्यातील धोके नाहीसे होऊन आयुर्मान वाढेल,याचीही बाजारात सोय आहे. तुम्ही कलाप्रेमी आहात असं तुम्हाला दाखवायचं आहे का ? अगदी,मायकेल एंजेलो वा लिओनार्दी द विंचीच्या चित्रकृती बाजारात लाखोंच्या संख्यंने उपलब्ध आहेत. खरेदी करा आणि लावा तुमच्या घराच्या भिंतीवर ! अशी सोय आहे. सुख ,आनंद स्वास्थ या आता कमॉडिटीज आहेत आणि त्या बाजारात मिळू शकतात असं वाटण्यासाठी वास्तव आणि कल्पित ( Real and fiction )यांच्यातल्या सीमारेषाच धुसर व्हाव्यात असं वातावरण आणि अवस्था निर्माण केली जातेय."[७]

समकालीन जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील विषमता, शोषण, स्वार्थनिर्मीती, रंजनपरता, स्पर्धा, हेवेदावे, चंगळवाद इत्यादी गोष्टी अरुण काळे यांनी तीव्र उपरोधाच्या पातळीवर मांडलेली आहेत.

*'माहितीच्या बैलांना*
*माणूस नाही माहित*
*आज किती अर्धपोटी झोपलेत ?*
*आज किती जागे आहेत पोट धरुन ?*
*चालू अर्थिक वर्षात*

*कितीजणांची झाली अवहेलना ?*

*वर्ग-वर्चस्वाने*

*चालू सांस्कृतिक मोसमात कितीजणांची झाली मानहानी*

*हे काहीच नसतं माहित*

*या माहितीच्या बैलांना'*

( माहितीचे माहितगार / नंतर आलेले लोक - 73 )

एकप्रकारे या क्रूर, विरुप जागतिकीकरणाच्या वास्तवात माणसाचे तुटलेपण जाणवते आहे. जागतिकीकरणाच्या लाटेत जसे वस्तूंचे जागतिकीकरण होऊ लागले आहे त्याप्रमाणे माणसाच्या माणूसपणाचे, प्रेम या भावनेचे जागतिकीकरण व्हावे अशी कवी मनीषा बाळगतो.

*'एका माणसाचा झाला एक समाज*

*दोघांचे दोन समाज, शंभरांचे शंभर*

*सगळी नाती आली चोरबाजारात विचारवंत फिरु लागले गुरख्यांसारखे*

*डांबरीकरणासारखा उखडला पुन्हा पुन्हा*

*रस्त्यातला माणूस*

*प्रेमाला डांबलंय देवळात'*

( प्रेमाचे होऊ द्या जागतिकीकरण / नंतर आलेले लोक - 41 )

काळे यांनी जागतिकीकरणात घडून येणाऱ्या वास्तवाचे आणि त्यात सामान्य माणसांवर झालेले अत्याचार, काळेंनी स्पष्ट केलेले आहे. एकीकडे श्रीमंत माणसे वेगवेगळ्या हॉटेलात जेवण करणारे तसेच सामान्य माणूस कुत्र्याप्रमाणे त्याला अन्न हुडकण्याची वेळ आलेली आहे. या नगरात माणूस माणूसपण गमावून बसलेला आहे. त्यामुळे या विचाराने सामान्य माणूस घाबरुन गेला आहे. श्रीमंत माणूस हा सामान्य माणसाला खाताना दिसतो. या महानगरात श्वास घेणेही सामान्य माणसाला अवघड झालेले आहे.

*'गिधाडे तर राहू लागलीत*
*शहरातच*
*मिळविलेत त्यांनी घटनात्मक हक्क*
*नागरी संस्कृतिचे*
*बोलताहेत मान्वी हक्कांवर'*

(गिधाडाचं उज्ज्वल भवितव्य /सायरनचे शहर - 12 )

एकिकडे वरीष्ठ वर्ग तर दुसरीकडे दुर्गंधी, रस्त्यावरचे खाऊन पोट भरणारे आपल्या कुटूंबाला जगवणारे हे सामान्य वर्गाचे जीवन महानगरात घडते आहे. काळेंना महानगरात वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तीची माणसे दिसतात. सामान्य वर्गातील आजारमय असणारी माणसे यांच्या जगण्यातील किळसवाणा प्रकार पाहून कवी अस्वस्थ होतो. सामान्य वर्गातील स्त्री ही पोट भरण्यासाठी आपल्या मुलांचे पोट भरविण्यासाठी स्वत:चे शरीर द्यायला तयार होते. ही सामान्य वर्गाची अवस्था काळे यांना विचित्र वाटते महागरीय या विषारी जीवनाचे वर्णन काळेंनी कवितेतून केलेले आहे. या महानगरातील सामान्य माणूस हा पशु-पक्ष्यासारखे जीवन जगत आहे. त्यामुळे सामान्य माणसाच्या चारीबाजूंनी गोंधळ होत असूनही या सामान्य माणसाला हे जग सोडून जाता येत नाही. अशा सामान्य वर्गाच्या जीवनाचे वर्णन आपल्या कवितेतून प्रकट केलेले दिसून येते.

## 7. चंगळवाद आणि भांडवलशाहीला विरोध

अरुण काळे यांची कविता ही चंगळवादाच्या विरोधात आहे. समाज, राजकारण, अशा क्षेत्रात चंगळवाद निर्माण झालेला दिसून येतो. चंगळवादी माणूस हा सामाजिक व्यवस्था बिघडवणे, एखाद्या गोष्टीत अडथळा आणणे, हिंसा, अत्याचार करणे ही लक्षणे त्याची दिसून येतात. तसेच घातक अशा चरस, गांजा, अफू, यांची मजा लुटावी व ते घेण्यास दुसऱ्यास प्रवृत्त करणे इ. चंगळवादाची लक्षणे दिसतात. अरुण काळे हे चंगळवादाच्या विरोधात आहे. काळे यांना चंगळवादाबद्दल अनादर वाटतो चंगळवाद हा अस्वस्थेचे जीवन,

अश्लिल, असभ्य, वर्तन, शिव्या घालणे अनेक शस्त्रे वापरणे धमकी देणे अशी कृत्ये करीत असतात. अशी चंगळवादी वृत्तीच्या माणसांना दुसऱ्याचे जीवनात हस्तक्षेप करण्याची सवय जडलेली असते.

*'पेटवून पाणी पेटवून रक्त*
*गिधाडे स्वत:च अंकुश झालीत*
*व्यवस्थेला हाताळतात.*
*व्यवस्थित किंवा काढतात मोडीत '*

(गिधाडाच उज्ज्वल भवितव्य/सायरनचे शहर - 12 )

चंगळवादी माणूस हा माणसासारखे राहत नाही. तो स्वत:चे माणूसपण विसरुन जातो. अरुण काळे यांना अशा चंगळवादी माणसांविषयी घृणा वाटते असा माणूस समाजात जन्माला येवून घृणास्पद व लांछनास्पद कार्ये करीत असतो. एक समाज म्हणून आपण किती क्रूर,विकृत अन निर्मम निढविलेले होत चाललो आहोत हे मांडतांना

*टुक टुक पाहणाऱ्यांनो कोल्हे-लांडगे, गिधाडांनो*
*तुटून पडा लुटालुटा, दात विचका पुढे घुसा*
*हाव आहेच, ताव मारा पोटं तुडुंब भरली आता*
*जाणाराची जान गेली, खेद नको*
*तो नालायक गेला म्हणा, नाचा अन् आनंद करा*
*घुंब घुंब नका नका, झिंग झिंग लपालपा*

( मल्टीलुटालुटीचा झिंग लपालपा /नंतर आलेले लोक - 96 )

माणसाला चंगळवादी जगण्याची नशा चढली आहे हे कवी स्पष्ट करतो.चंगळवादी हा स्वत:चे जीवन व्यर्थ घालवितो तो गिधाडासारखे वागतो. टोच्या मारीत राहतो.

*'गिधाडे आता काहीही होऊ शकतात*
*कबुतरांना घाऊन*
*शांततेच प्रतीकही होऊ शकतात'*

(गिधाडाचं उज्ज्वल भवितव्य /सायरनचे शहर- 12 )

गिधाडाप्रमाणे चंगळवादाचे जीवन असते. तो सामान्यांना बळकावून स्वत: खात राहतो आणि तो स्वत: काहीही न घडल्याचा आव आणतो. अशा या चंगळवादाच्या विरोधात वर्गण केलेले दिसून येते. भांडवलशाहीमुळे माणसांचे प्रश्न बदलत चालले आहे. गरीब कायम रस्त्यात आहे. शेतकरी हा मरत आहे. मध्यमवर्गीय तरुणाला आयुष्य उरलेले नाही असे दिसते. अशा प्रश्नांकडे दुर्लक्ष करुन भांडवलशाहीच्या विरोधात आवाज उठवलेला दिसून येतो. लोकसंख्येत प्रचंड वाढ झालेले दिसून येते. भंडवलशाहीमुळे घर व्यवसाय, धंदे, कारखाने शाळा, रस्ते इ. भांडवलशाहीत समावेश असतात. भांडवलशाहीमुळे अनेक समस्या निर्माण होते. भांडवलशाहीत देवाण-घेवाणाची क्रिया सतत चालू असते. भांडवलशाहीमुळे कामगार मालक यांच्या समस्या निर्माण होत असते. भंडवलशाहीमुळे कामगार वर्ग चिरडला जातो. कामगारांच्या हक्कांसाठी भांडणाऱ्या कामगारांचे नेते आवाज उठवितात. तरी पण त्यांना त्यांचे हक्क मिळविण्यात अडचण निर्माण होते. त्यामुळे कामगारवर्गाच्या अडचणी दूर होत नाहीत. भांडवलशाही श्रीमंतांची मक्तेदारी आहे. श्रीमंतांच्याजवळ भांडवल मोठ्या प्रमाणात असते. ते सामान्य वर्गाला, गरीब वर्गाला किंवा कामगार वर्गाला कर्जाच्या रुपाने देतो. त्यामुळे सामान्य वर्गाला नंतर कर्जफेड न झाल्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा समस्येमुळे भांडवलशाही ही या वर्गाला नाहक त्रास देते आहे. अरुण काळे यांची कविता भांडवलशाही आणि चंगळवादाला कडाडून विरोध करते.

## 8. माणूसपणासाठी प्रार्थना

अरुण काळे यांची कविता ही मानवतावादी कविता आहे. मानवी जीवनावर आधारीत काळेंची कविता आहे. अरुण काळे सर्वप्रथम माणसाच्या जगण्याला प्राधान्य दिलेले आहे. अरुण काळे यांनी गरीब, श्रीमंत, मालक, मजूर माणसाचा कामापुरता वापर करणारी निरपराधांचा छळ करणारी सर्वसामान्यावर अधिराज्य गाजवणारी अशा संबंधाचे स्पष्टीकरण काळेंनी कवितेतून केलेले आहे. काळेंनी सामान्य माणसांची वेदना कवितेतून मांडलेली आहे. अरुण काळे यांनी कवितेतून माणसाने माणसांवर प्रेम करावे ही जाणीव दिली. काळेंनी

कवितेतून मानववतावादाचे चित्रण केलेले दिसते.

*'जेव्हा काळ्या कोकणात काळ्या सत्तेच पाणी*
*पेटलेल मी पाहिलं तेव्हा मी अवघा*
*निसर्ग झालो*
*करुणेच्या गर्दसावलीत विसावून*
*हिरोशिमावर पडलेला काळा पाऊस*
*मी सोसला काळे इतिहास माझे दावेदार झालेत.*
*पानापानांवरील काळाबाजार मी फाडू लागलो.*
*माझा निसर्ग काळ ते सुंदरपर्यंत*
*पोहचत काळ्या शक्तीला बघून स्फुरु लागला'*

(मी एक निसर्ग / रॉकगार्डन - 66 )

माणसाचे स्वातंत्र्य हिसकावून घेवून व्यवस्थेने माणसाचे अस्तित्व पुसून त्याच्यापाशी, श्वास कोंडून त्याच्यासमोरचा प्रकाश गायब केला आहे म्हणून या व्यवस्थेचे सांगणे अरुण काळे यांच्या कवितेला महत्त्वाचे दिसून येते. माणसाचे जीवन काडीमोल झाले. मात्र माणसाच्या जडण-घडणीमुळे निसर्गाला आकार मिळाला. माणसाच्या घाम आणि श्रमातून सौंदर्य प्राप्त झाले माणसांनी दगडातून शिल्पे कोरली, हे निर्माण करणारी इतरांसाठी निवारा देणारी माणसे बेघर झाली. माणसाचे पुढे रक्त सांडले.

माणसाच्या घामाचे पाट वाहिले. रक्तसांडेपर्यंत माणसे मेहनत करु लागली म्हणून काळे यांची कविता माणूस, माणसाचे माणूसपण वाया जावू नये म्हणून धडपडत राहते. निसर्गातील आवश्यक गोष्ट कोणती पाणी पण पाण्यापासून माणूस दूर झाला. माणसाला अधिकार, स्वतंत्र्यापासून वेगळा ठेवला गेला. त्यामुळे आंबेडकरांनी युगाची सुरुवात केली आणि बदल घडवून आणली. अशा पध्दतीने अरुण काळे यांची कविता ही समस्त माणसाची कविता आहे.

**प्रकरणाचा सारांश :**

. या प्रकरणाच्या पूर्वी रॉकगार्डन, सायरनचे शहर, नंतर आलेले लोक या काव्यसंग्रहाच्या अनुषंगाने अरुण काळे यांच्या कवितेतील अन्य वैशिष्ट्यांचा विचार केला आहे. अरुण काळे यांच्या कवितेचे वेगळेपण चटकन लक्षात येते. कवितासंग्रहाच्या शीर्षकातून कवितेची प्रयोगशिता प्रकट होते. अरुण काळे यांच्या कवितेत अन्य वैशिष्ट्यांचा समावेश केलेला आहे. काळे यांच्या कवितेतून चळवळीतील कार्यकर्त्यांचे आत्मचिंतन प्रकट होते. दलित कवितेला सामर्थ्य आणि वेगळेपण मिळवून देणारी ही कविता आहे. महानगरीय जीवनाचा आलेख मांडण्याबरोबरच ही कविता कोणत्याही विशिष्ट साचेबंद कप्प्यात बंदिस्त करता येत नाही. या कवितेत उत्कट आणि भावदर्शी व्यक्तीचित्रणे प्रकट झाली आहेत. तसेच ही कविता जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत माणसाची बाजू घेणारी कविता आहे. तसेच ते चंगळवाद आणि भांडवलशाहीला विरोध करते ही कविता म्हणजे माणूसपणासाठी प्रार्थनाच होय.

## संदर्भ

1. अरुण काळे, *सायरनचे शहर*, नाशिक, सत्यजित प्रकाशन, पहिली आवृत्ती, 1997, पृष्ठ 2
2. रा.ग.जाधव, *सायरनचे शहर*, नाशिक, सत्यजित प्रकाशन, पहिली आवृत्ती, 1997,पृष्ठ 2
3. महेंद्र भवरे, *सायरनचे शहर*, नाशिक, सत्यजित प्रकाशन, पहिली आवृत्ती, 1997, पृष्ठ 2
4. गणेश विसपुते, *अरुण काळे यांच्या कवितेतील व्यक्तिचित्रण*, नवाक्षर दर्शन, वर्ष4, अंक 3-4, एप्रिल ते सप्टें.2008, पृ.49.
5. अरुण काळे, *नंतर आलेले लोक उपयोजित मराठी*, लोक वाङमय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, 2006, पृ. 76 - 77
6. गणेश विसपुते, *अरुण काळे यांच्या कवितेतील व्यक्तिचित्रण*, नवाक्षर दर्शन, वर्ष4, अंक 3-4, एप्रिल ते सप्टें.2008, पृ.49.
7. अविनाश सप्रे, *जागतिकीकरण आणि संस्कृती विचार : तेव्हा आणि आता आभिदानंतर दिवाळी*, 2005, पृ. 15

## प्रकरण : 6

## उपसंहार

अरुण काळे यांच्या कवितेचा अभ्यास तिची वैशिष्ट्ये व वेगळेपण शोधण्याच्या हेतूने प्रस्तुत अभ्यास केलेला आहे. अरुण काळे यांच्या कवितेचा प्रवाह अधिक वैशिष्ट्यपूर्ण आणि दलित कवितेला नवे भान देणारी आहे. दलित कवितेत अरुण काळे यांच्या कवितेने नवा प्रवाह निर्माण करुन वेगळे वळण दिले. अरुण काळे यांच्या कवितेचे महत्त्व अनेकांनी मान्य केले आहे. 'रॉकगार्डन' (1993 ), 'सायरनचे शहर' ( 1997 ) आणि 'नंतर आलेले लोक' ( 2006 ) या तीन काव्यसंग्रहाच्या अनुषंगाने प्रस्तुत अभ्यास केला आहे.

अरुण काळे यांच्या कवितेचा अभ्यास तिची वैशिष्ट्यपूर्णता व वेगळेपणा दाखविण्यासाठी या कवितेतील आशयसूत्रे, अविष्कारतंत्रे, भाषा-शैली आणि अन्य वैशिष्ट्ये या अंगानी अभ्यास केला आहे. या अभ्यासाची मांडणी करताना अरुण काळे यांच्या कवितेचे वेगळेपण स्पष्ट करण्यासाठी 1980 पूर्व मराठी कवितेचे स्वरुप आणि वाटचाल ध्यानात घेणे आवश्यक होते म्हणून त्याचा पहिल्या प्रकरणात विचार करण्यात आलेला आहे. अरुण काळे यांच्या कवितेचा अभ्यास पाच प्रकरणात केला असून या अभ्यासाचा सारांश प्रस्तुत उपसंहार या सहाव्या प्रकरणात मांडलेला आहे.

अरुण काळे यांच्या कवितेच्या अभ्यासास सुरुवात करण्यापूर्वी मराठी कवितेचे स्वरुप आणि वाटचाल या पहिल्या प्रकरणाचा विचार केलेला आहे. कविता ही एक भाषिक संरचना आहे. पण कवितेची निश्चित व्याख्या करणे अवघड आहे. कवितेत शब्द आणि क्रम यांचे विशिष्ट रुप वापरले जाते. माणसाच्या मुलभूत गरजा या कवितेशी जोडल्या गेल्या. निव्वळ शटदकृती म्हणजे कविता नव्हे, तर त्या शब्दकृतीचे विशिष्ट संकेताना अनुसरुन केलेले रुपांतर म्हणजे कविता असे कवितेची थोडक्यात व्याख्या करता येईल. कविता ही मन आणि भावना स्पष्ट करणारी भाषा असते. कविता ही छंद, लय, वृत्त या शैलीत असते. कविता ही विशिष्ट घटकांनी बनलेली असते. कवितेने अनेक अर्थाचे सूचन करावे ही अपेक्षा

कवितेकडून असते. प्रत्येक चांगला कवी हा प्रत्येक चांगली कविता घडविण्याचा प्रयत्न करीत असतो. अशाप्रकारे कवितेच्या स्वरुपाचा शोध घेताना कवितेचा शब्दांचा वापर, लय, छंद, नाद, भाषा, उच्चार विशेषणे, अलंकार, प्रतिमा-प्रतीकांचा वापर या घटकांचा थोडक्यात विचार केला. आधुनिक मराठी कवितेची वाटचाल ही केशवसुतांपासून सुरुवात झाली. हे जरी सत्य असले तरी केशवसुतांच्या अगोदर महात्मा फुले यांच्या साहित्यात आधुनिकता बघावयास मिळते. महात्मा जोतिबा फुले यांनी आधुनिक मराठी कवितेला एक नवे वळण दिले. फुल्यांनंतर केशवसुतांच्या कवितेपासून मराठी कवितेला एक वेगळी जाणीव झालेली दिसते. त्यामुळे मराठी कवितेत नवनवीन बदल घडून आले. केशवसुतांनी मराठी कवितेत अनेक प्रयोग केलेले दिसून येतात. त्यामुळे मराठी कविता नावारुपास आलेली दिसते. केशवसुतांचे मराठी कवितेतील योगदान हे फार मोलाचे आले.दुसऱ्या प्रकरणामध्ये अरुण काळे यांच्या कवितेतील आशयसूत्रांचा विचार केलेला आहे अरुण काळे यांच्या कवितेत आशयसूत्रांची विविधता दिसते. आंबेडकरीय विचार प्रेरणा  हे अरुण काळे यांच्या कवितेतील महत्त्वाचे आशयसूत्र आहे. काळे यांच्या कवितेतून डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे व्यक्तिचित्रण घडून येते. काळे हे चळवळीतले कवी आहेत. त्यांनी आपल्या कवितेतून दलित वर्गाची जाणीव स्पष्ट केलेली आहे. डॉ.आंबेडकर यांच्या विचारांचा पाढा काळे यांच्या कवितेने मांडलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी दलित वर्गाला प्रेरणा दिली. या प्रेरणेतून दलित वर्गाला नवी दिशा निर्माण करुन दिली . डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अंगी असलेल्या प्रज्ञा, प्रतिज्ञा,आणि विद्वता या गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व हे प्रबळ ठरते. त्यानंतर जागतिकीकरण हे अरुण काळे यांच्या कवितेतील दुसरे आशयसूत्र आहे. काळे यांनी आपल्या कवितेतून जागतिकीकरणाचा मुद्दा मांडलेला दिसतो. मानवी जीवन जागतिकीकरणामुळे अगतिक आहे अशी भूमिका अरुण काळे यांनी मांडली आहे. अरुण काळे उपेक्षित -वंचित वर्गाचे चित्रण केलेले आहे. माणूस हा धर्म ,जात यांच्या भेदामुळे ग्रासलेला दिसतो. उच्च-निच्च, श्रीमंत-गरीब अशा धर्मजात या युध्दखोरीमुळे दुखावला आहे. माणसाचे

शोषण हे अर्धवट राहिलेले दिसते. त्यामुळे माणूस हा अत्याचाराला बळी पडतो. याचे वर्णन काळे यांनी कवितेत केलेले आहे. अरुण काळे यांची कविता ज्या अनेक गोष्टीमुळे वेगळी वाटते त्यापैकी एक म्हणजे या कवितेतून होणारे स्त्रीजीवनासंदर्भात वेगवेगळी व्यक्तीचित्रणे आलेली आहेत. आई, पत्नी, प्रेयसी या नात्यांच्या स्त्रीबरोबर तसेच कुटूंबासाठी नाचणाऱ्या शरीराची विक्री करणाऱ्या आपल्या भावना बाजूला सारुन कुटूंबाठी आपले स्वत:चे जीवन उध्दवस्त करणाऱ्या अशा अनेक स्त्रीयांच्या जीवनाचे चित्रण काळे यांच्या कवितेत साकार झालेले आहे. ' आई ' ही स्त्रीजीवनातील महत्वाची कविता आहे. काळे यांचा स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक आहे. स्त्रीजीवनातील लहानीबाय या स्त्रीची कहानी सांगता येईल या लहानीबायचे वेश्या या नावाशी संबंध जोडले गेलेले दिसते. अशा अनेक कवितेतून काळे यांनी स्त्रीजीवनाची विविध रुपे प्रकट केलेली आहेत. अरुण काळे यांच्या कवितेत ' महानगरीय जीवन ' या आशसुत्राचा विचार केलेला दिसून येतो. काळे यांच्या 'सायरनचे शहर' या कवितेने महानगरीय जीवनाचे हे एक आक्राळविक्राळ रुप धारण केलेले आहे. महानगरीय जीवन सामान्य माणसांच्या हिताला परवडणारे नाही.महानगरीय जीवन हे पोटासाठी सतत धडपडणाऱ्या माणसांच्या जीवनाला जगणे अशक्य बनून एक प्रकारची जगण्यातली स्थिती अनुभवावी लागते. गर्दी, अपघात, धावपळ, चेंगराचेंगरी, अप्रदुषित वातावरण, गुन्हेगारी अशा अनेक गोष्टींना तोंड देताना महान्गरीय माणूस सतत असुरक्षितता जाणवू लागला आहे. कवी यांच्या कवितेत महानगरातील सामान्य माणसाच्या जीवनाचे चित्रण केलेले आहे.

अरुण काळे यांच्या कवितेतील जातीय ऐक्याची जाणीव या आशसूत्रांचा विचार केलेला आहे. काळे या जात ,पात, धर्म, पंथ याविषयी समाजात घडणाऱ्या जातीय घटनेची सविस्तर मांडणी केलेले आहे. समाजात वेगवेगळया धर्माचे, जातीचे लोक राहतात त्यांच्यामध्ये जातीय ऐक्याची भावना निर्माण होते. त्यामुळे ते एकाग्रता करुन आपले उदरनिर्वाह करीत असतात.दंगल, भांडणे, जाळपोळ, मोर्चा, संप यांतून अनेक संघर्ष निर्माण होतात. त्यामुळे धर्म,जात या नावावर हे वाद घडून येत असतात. धर्म जातभेद यातून निर्माण झालेला वाद यामुळे अनेकांचे बळी गेलेले आहेत. अरुण काळे यांच्या कवितेतून महानगरातील असुरक्षित जीवन या आशयसुत्रांच विचार केलेला आहे. महानगरात सामान्य

माणूस हा असुरक्षितेचे जीवन जगत आहे. महानगरात निर्माण झालेला जागेचा प्रश्न,गर्दी,खून,मारामारी,गुंडगिरी असे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यामुळे असुरक्षितता निर्माण झालेली दिसते. अरुण काळे यांच्या कवितेत आर्थिक विषमता आणि चंगळवाद या आशयसूत्राचा विचार केलेला दिसून येतो. समाज-राजकारण अशा सर्वत्र क्षेत्रात वेगळी स्थिती निर्माण झाली आहे.काळे यांनी आर्थिक विषमतेची मांडणी केलेली दिसते. आर्थिक विषमतेत धर्म-जात,नितीमत्ता म्हणून स्वीकार करणारे घटक येतात. आर्थिक विषमतेमुळे कनिष्ठ वर्गातील लोकांचे नुकसान झालेले दिसते. यामुळे अरुण काळे यांच्या कवितेचे वेगळेपण दिसून येते.

अरुण काळे यांच्या कवितेतील आशयसूत्रांचा विचार केल्यानंतर तिसऱ्या प्रकरणामध्ये अरुण काळे यांच्या कवितेतील आविष्कारतंत्राचा विचार केलेला आहे. काळे यांच्या कवितेतील आविष्कारतंत्रें हे वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत असे जाणवते. महानगरात रस्त्यावरुन गर्दीत वावरत असून देखील वाटयाला येणारे एकाकीपणा,परिस्थितीशी सामोरे जाण्यासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडी,असे वातावरणात गुदमरुन टाकणारे अनुभव काळे यांनी मांडलेले दिसतात.महानगरीय जाणिवांच्या संदर्भांना काही जीवनदायी प्रेरणेचा वेध घेणे अरुण काळे यांच्या कवितेचे वैशिष्टय ठरते. काळेंना महानगरीय जीवनाचे वास्तव आपल्या कवितेतून अनेक प्रतिमांचा वापर करुन मांडल्याचे दिसून येते. अशा वेगवेगळया प्रकारची आविष्कारतंत्रे या प्रकरणात समाविष्ट केलेली दिसतात.

चौथ्या प्रकरणांमध्ये अरुण काळे यांच्या कवितेतील भाषा आणि शैलीचा विचार केलेला आहे. काळे यांच्या कवितेतील प्रतिमा या वेगळया स्वरुपाच्या आहेत. सामाजिक जीवनातील विशेष करुन महानगरीय व दलित जीवनाशी निगडीत वेगवेगळ्या प्रतिमा त्यांच्या कवितेत दिसतात. अशा विलक्षण प्रतिमांच्या वापरामुळे अरुण काळे यांची कविता मराठी कवितेत स्वत:ची नवी ओळख दाखविताना दिसते.काळे यांनी कवितेतून वेगवेगळ्या अशा अनेक इंग्रजी शब्दांचा वापर मराठी बोलीभाषेच्या अनुषंगाने केला आहे. महानगरीय

पर्यावरणात अशा प्रकारच्या रुढ झालेल्या इंग्रजी शब्दांचा वापर योग्य ठरतो.त्यामुळे काळे यांच्या कवितेत इंग्रजी शब्दांचा वापर अनावश्यक वाटत नाही. या प्रकरणात अरुण काळे यांच्या कवितेतील भाषा व शैली यांचा अभ्यास केलेला आहे.

पाचव्या प्रकरणांमध्ये अरुण काळे यांच्या कवितेतील अन्य वैशिष्ट्यांचा विचार केलेला आहे. काळे यांच्या कवितेत चळवळीतील कार्यकर्त्याचे आत्मचिंतन दिसून येते. काळे यांनी दलित कवितेला सामर्थ्य आणि दिशा देणारी कविता मांडली आहे. त्यांच्या कवितेत महानगरीय जीवनाचा आलेख प्रकट होतो. काळे यांची कोणत्याही विशिष्ट साचेबंद कप्प्यात बंदिस्त करता न येणारी कविता आहे. काळे यांनी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत माणसाची बाजू घेणारी कविता लिहीली आहे. काळे यांनी चंगळवद आणि भांडवलशाहीला विरोध केला आहे. अरुण काळे यांची कविता म्हणजे माणूसपणासाठीची प्रार्थना होय. या सगळ्या अभ्यासातून अरुण काळे यांच्या कवितेचे वेगळेपण लक्षात येते. अरुण काळे यांची कविता एकूण मराठी कवितेचा विचार करता वेगळे असण्याचा प्रत्यय येतो. कवितेकडे आधिक गंभीरपणे अरुण काळे पाहताच असे लक्षात येते, अपरिचित अशा अनुभव विश्वाला मांडण्यासाठी कवितेची नवी भाषा आणि अविष्कारतंत्रे शोधून त्यांनी आपल्या कवितेची मांडणी केली आहे. अरुण काळे यांच्या कवितेत आशसूत्रांची विविधता दिसते. त्यांच्या कवितेची भाषा वाचकाला चिंतनप्रवृत्त करुन आशयाची परिणामकारकता वाढवते. समाजाची भाषाच त्यांनी नैसर्गिकपणे वापरली आहे. त्यांची प्रतिमासृष्टी वास्तव समाजजीवनाची निदर्शक आहे. एकूणच अरुण काळे यांची कविता मराठी कवितेला नवे भान देणारी आणि नवे वळण देणारी आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

* * *

## आधारभूत ग्रंथांची सूची


1. काळे अरुण, *रॉकगार्डन,* पहिली आवृत्ती, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, 1993.
2. काळे अरुण, *सायरनचे शहर,* पहिली आवृत्ती, सत्यजित प्रकाशन, नाशिक, 1997.
3. काळे अरुण, *नंतर आलेले लोक,* पहिली आवृत्ती, लोक वाङमय गृह, मुंबई, 2006.


●

## संदर्भ ग्रंथ सूची


1. कदम सुरेश, *कवी आणि कविता*, मुंबई, मनोविकास प्रकाशन, 1996.
2. कऱ्हाडे सदा, *दलित साहित्य चिकित्सा*, औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, 2001.
3. करोगल सुषमा (संपा.), *स्वातंत्र्योत्तर मराठी कविता*, पुणे प्रतिमा प्रकाशन, 1999.
4. काळे अक्षयकुमार, *अर्वाचिन मराठी काव्यदर्शन*, नागपूर, पां.बा.बनहट्टी प्रकाशन 1999
5. कुलकर्णी गो.म., *आधुनिक मराठी वाङमयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी*, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, 1994.
6. कुलकर्णी वा.ल., *मराठी कविता जुनी आणि नवी*, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, 1980.
7. कोत्तापल्ले नागनाथ, *आधुनिक मराठी कविता : एक दृष्टिक्षेप*, परभणी, प्रतिभास प्रकाशन, 1999.
8. जाधव मनोहर, *समीक्षेतील नव्या संकल्पना*, औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, 2001.
9. जाधव रा.ग., *निळी पहाट*, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, 1995. चौ.आ.
10. जाधव रा.ग., *वाङमयीन आकलन*, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, 1977.
11. ठाकूर रविंद्र, *प्रवाह आणि प्रतिक्रिया*, औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, 1999.
12. डहाके वसंत आबाजी, *कवितेविषयी*, औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, 1999.
13. तायडे मनोज, *आस्वादनामा*, औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, 2002.
14. देशपांडे केजकर प्रकाश, *मराठी कविता : नवी वळणे*, औरंगाबाद, साकेत प्रकाशन, 1994.
15. नेमाडे भालचंद्र, *टीकास्वयंवर*, औरंगाबाद, साकेत प्रकाशन, 1990.
16. नेमाडे भालचंद्र, *साहित्याची भाषा*, औरंगाबाद, साकेत प्रकाशन, 1987.
17. पठारे रंगनाथ, *आस्थेचे प्रश्न*, श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, 2000.
18. पठारे रंगनाथ, *सत्त्वाची भाषा*, श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, 1997.

19. पवार गो.म. आणि म.द.हातकणंगलेकर, *मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप,* (संपा.) मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, 1986.

20. पाटणकर वसंत, *स्वातंत्र्योत्तर मराठी कविता* (1945 ते 1960), (संपा.) नवी दिल्ली, साहित्य अकादमी, 2002.

21. पाटील म.सु., *कवितेचा रुपशोध,* श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, 1999.

22. भवरे महेंद्र, *दलित कवितेतील नवे प्रवाह,* श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, 2001.

23. भोळे भा.ल., *साहित्य प्रत्यय,* औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, 2001.

24. मनोहर यशवंत, *मराठी कविता आणि आधुनिकता,* नागपूर, आंबेडकर धम्म प्रकाशन, 1993.

25. मेश्राम केशव, (संपा.) *विद्रोह कविता,* पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 1987. दु.आ.

26. रसाळ, सुधीर, *कविता आणि प्रतिमा,* मुंबई, मौज प्रकाशन, 1982.

27. शेळके शांता / प्र.ना.परांजपे व इतर (संपा.), *कविता विसाव्या शतकाची,* पुणे, उत्कर्ष प्रकाशन, 2000.

28. सदरे केशव, *कवितेतील आधुनिकवाद,* श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, 2000

## नियतकालिके

1. अभिधानंतर, दिवाळी, 2005.

2. नवाक्षर दर्शन, (अरुण काळे विशेषांक), जानेवारी - फेब्रुवारी-मार्च - 2007.

891.461
KAM
T15928